दा. क्र. ८७४

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय भा. वा
दा. क्र. ८७४

# अमित्रदर्शन

IRBK-0100874
IRBK-0100874

म. ग्रं. सं. ठाणें
ग्रंथ क्र. ........
वा. नं. २९४

डमध्यप्रांत शाळाखात्यांनी बक्षिसें
ा. यांसाठी मंजूर केलेलें

# [illegible]सन्मित्रदर्शन.



लेखक व प्रकाशक
**पारुजी नारायण मिसाळ.**
बालसन्मित्र-कार्यालय, मालवण.

नोवेंबर ] आवृत्ति तिसरी [ १९२९

**किंमत दीड आणा.**

IRBK-0100874

# मालेविषयीं कांहीं अभिप्राय.

**प्रो. नारायण केशव बेहेरे**, एम्. ए. नागपूर—" प्रतिकूल परिस्थिति असतांना, दृष्टीआड राहून बालसृष्टि नव्यानें घडविण्याचा आपला सतत चाल-लेला उद्योग पाहिला म्हणजे मनाला विस्मय व आदर वाटतो. आपल्या दीर्घो-द्योगाबद्दल आपलें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच पडेल."

**श्री. यशवंत लक्ष्मण गुण्ये** बी. ए. एल्.एल्. बी; वर्धा—मी बाल-सन्मित्रमालेचीं पुस्तकें वाचून पाहिलीं. मुलांना आवडतील आणि सहज समज-तील अशा भाषेंत व मुलांना नीतिदृष्ट्या अवश्य अशा विषयांवर यांतील गोष्टी असल्यामुळें हीं पुस्तकें पालकांनीं मुलांच्या हातीं देण्यास सर्वथा योग्य आहेत. किंमती माफक असल्यामुळें सर्वांनीं आश्रय देण्यायोग्य ही माला आहे.

**नवयुग**—लहान मुलांसाठीं मराठी भाषेंत निघणाऱ्या माला व इतर पुस्तकें यांच्यामध्यें बालसन्मित्रमालेंतून प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचा नंबर बराच वर लागेल. बालबोध मासिकाचे जनक कै. रा. सा. ओक यांच्याप्रमाणें सोपी भाषा लिहिण्याची हातोटी श्री. मिसाळ यांना चांगली साधली आहे. या पुस्तकांतून लहान मुलांचें मनोरंजन होऊन त्यांना त्यापासून चांगला बोधही प्राप्त होईल. प्रत्येक आईबापांनीं हीं पुस्तकें आपल्या मुलांस अवश्य वाचावयास द्यावीं.

**हिंदु**—मालेच्या पुस्तकांची भाषा सोपी असून तीं मुलांना वाचनाची गोडी लावणें, त्यांचें मनोरंजन करणें व त्यांबरोबरच त्यांना सदुपदेश देणें असें तिहेरी कार्य साधणारीं असल्यामुळें हीं पुस्तकें प्रत्येक पालकानें आपल्या मुलाबाळांच्या हातांत देण्यालायक आहेत.

**विकास**—या मालेचें कोणतेंही पुस्तक प्रसिद्ध झाल्याबरोबर तें सर्व वाच-नालयाकरितां विनदिक्कत घ्यावें अशा प्रकारची ही माला आहे. संपादक रा. पा. ना. मिसाळ यांची विषयाची चांगली निवड आणि सुबोध भाषा याकरितां जी प्रसिद्धि आहे ती सर्व पुस्तकांतही अनुभवास येते.

[ या पुस्तकासंबंधी सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. ]

# सन्मित्रदर्शन.

## १ ईशस्तवन.

- आर्या -

देवा दीनदयाळा करितों भावें पदीं तुझ्या नमन ।
राहो कृपा सदा तव भक्तीपासुनि ढळो कदा न मन. ॥१॥
द्यावा वडिलजनांतें गुरुवर्यांतें सदैव सन्मान ।
कालत्रयींहि न घडो, त्यांचा माझेकडून अवमान. ॥२॥
संपादण्यांत वाटो ज्ञान मला नित्य नवनवी गोडी ।
ज्ञानप्रीती माझ्या मनिंची न ढळो कदापिही थोडी ॥३॥

## २ सन्मित्र.

पद [ भूपती खरे ते वैभवसुख सेवीती ]

बोधितो हितवचें मधुर कदा बोलूनी ।
योजितो प्रसंगीं कटु परि हितकर वाणी ॥
दावितो मार्ग जो योग्य तोच पाहूनी ।
धरि कल्याणाची इच्छा अंतःकरणीं ॥
सुखि जसें दुःखिही तसें अढळची ज्याचें, ।
राहतें प्रेम अंतरीं निरंतर साचें. ॥
चाल-धन मित्र हेंच ज्या सारें । वाटतें. ।
तद्वियोगवारें ज्यातें । जाचतें. ।
तत्सेवा करितां ज्यातें सौख्य तें. ।
रत्नेंही ज्याच्या वरुनी ओंवाळावीं ।
सन्मित्र धन्य तो ! किती थोरवी गावी ? ॥१॥

१ बालभूषण- हीच इच्छा-पृ. ५. २ नीतिमंजूषा पृ. ५

## ३ काय वाचावें ?

पुस्तकांना मित्रांची उपमा दिलेली आहे. मित्रांत ज्याप्रमाणें चांगले आणि वाईट मित्र असतात, त्याप्रमाणें पुस्तकांतही चांगलीं व वाईट पुस्तकें असतात. वाईट पुस्तकांपासून तोटे आहेत, म्हणून तुम्ही वाईट पुस्तकें बिलकुल हातीं घेऊं नका. वाईट पुस्तकें वाचून आपल्या जन्माचें मातेरें करून घेतलेले कांहीं इसम दृष्टीस पडतात. यासाठीं वाईट पुस्तकांना हातसुद्धां लावूं नका. ज्यांच्या वाचनापासून आपल्या वर्तनावर चांगला परिणाम होईल, अशा प्रकारच्या पुस्तकांचेंच वाचन ठेवा.

## ४ मुलांची देशसेवा. ( दादाभाईंचे उद्गार. )

" हिंदभूमीची सगळी उमेद आतां तुमच्या जिवावर आहे. तेव्हां तुम्ही आपल्यावरची जबाबदारी ओळखून आपल्या जन्मभूमीविषयींचें कर्तव्य योग्य प्रकारें करा. भारतभूमीला अद्याप पुष्कळ कर्तव्य करावयाचें आहे, त्यासाठीं आपली कमाल खर्चीं घातली पाहिजे."

## ५ अभ्यासाची उजळणी.

जे विद्यार्थी झालेल्या विषयाची उजळणी करीत नाहींत, त्यांची नेहमीं फजितीच होते. त्यांना परीक्षेच्या वेळीं कांहीं येत नाहीं. इतकेंच नाहीं, तर ते जें कांहीं शिकत असतात, तेंही त्यांना धड समजत नाहीं. एकाद्या विषयाचा मागील भाग चांगला तयार नसला, तर पुढील भाग कळण्यास फार अडचण पडते.

---

३ **दिवाळीची देणगी**-वाचन-पृ. ६१. ४ **चरितादर्श**-दादाभाई नौरोजी चरित्र-पृ. १६. ५ **अभ्यास**-प्रकरण ६ पृ. ७९.

# ६ आळशांचे राजे.

एका बादशाहानें जे कोणी महा आळशी असतील त्यांनीं ऐदी-खान्यांत येऊन रहावें, त्यांच्या पोटापाण्याची तजवीज सरकारांतून केली जाईल, अशी सर्व राज्यांत दवंडी पिटविली! तेव्हां हजारों लोक जमा झाले! यांतले खरे आळशी कोण ते शोधून काढावे, असा बादशाहानें वजिरास हुकूम केला. वजिरानें दुसरें तिसरें कांहीं न करितां त्या आळशांच्या घराला ( ऐदीखान्याला ) आग लावून दिली! आग पहातांच बहुतेक सर्व आळशी जीव घेऊन पळूं लागले! तिघे आळशी मात्र स्वस्थ पडून होते. त्यांपैकीं एकजण त्या आगीकडे पाहून म्हणतो, "मित्रहो, बघा हें घर कसें जळतें आहे तें?" दुसरा आळशी डोळे मिटून पडल्या पडल्याच म्हणाला, "मोठा शहाणाच दिसतोस तूं! घर जळतें तर जळेना! तें पहाण्याकरितां डोळे उघडण्याची तसदी घ्यावी कोणी?" हें ऐकून तिसरा आळशी म्हणतो, "किती मूर्ख मनुष्य आहां रे तुम्ही? तुम्हांला बोलण्याचासुद्धां आळस कसा येत नाहीं?" प्राण जाण्याचा समय आला आहे, तरी यांना आळसामुळें आपल्या प्राणांचीही पर्वा वाटत नाहीं! आतां हे खात्रीनें प्राणास मुकतील, असें पाहून बादशाहानें यांना बाहेर काढविलें! नंतर बादशाहानें त्यांना विचारिलें, "तुम्हांला त्या आगींतून बाहेर काढून आणलें नसतें, तर तुम्ही जगतां काय?" ते म्हणाले, "सगळ्या कामीं जसा आम्हांला आळस, तसा मरणाचाही आम्हांस आळस आहे! म्हणूनच आम्ही आतां जगलों!" हें उत्तर ऐकून बादशाहाला हसतां हसतां पुरेवाट झाली!

---

६ नीतिमंजूषा–आळसाची कमाल–संक्षेप करून पृ. ४६–५०

## ७ गुरूंबद्दल आदर.

" मास्तरांचा कंटाळा करून अगर त्यांच्यासंबंधानें तिरस्कार बाळगून, तुमचें खरें कल्याण कधींही होणार नाहीं. तुम्ही आपल्या गुरुजींच्या म्हणण्याकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय कराल व त्याप्रमाणें वागूं लागाल, तर तुमचा फायदा होऊन गुरुजीं-चेंही प्रेम तुमच्यावर बसेल. तुमचें आणि मास्तरांचें काय हाडवैर आहे हात धुऊन तुमच्या पाठीस लागायला ? मास्तर सांगतील त्या गोष्टीचा विचार करा. एकदम एकाद्या गोष्टीवरून त्यांच्यासंबंधानें तुम्ही आपलें मत बनवूं नका. "

## ८ घोकंपट्टी.

" हिंदुस्तानची नवीन राजधानी दिल्ली आहे, तेथें हिंदुस्तानचे व्हाइसराय म्हणजे गव्हर्नर जनरल राहातात. " हें वाक्य एक विद्यार्थी पुढें लिहिल्याप्रमाणें घोकीत होता. हिंदुस्तानची हिंदुस्तानची, हिंदुस्तानची नवीन नवीन, हिंदुस्तानची नवीन, हिंदुस्तानची नवीन, हिंदुस्तानची राजधानी, नवीन, हिंदुस्तानची राजधानी, दिल्ली दिल्ली दिल्ली, आहे आहे आहे, हिंदुस्तानची नवीन नवीन, तेथें तेथें तेथें तेथें व्हाइसराय, तेथें व्हाइसराय म्हणजे, व्हाइसराय, गव्हर्नर गव्हर्नर गव्हर्नर, जनरल जनरल जनरल राहातात. " अशा घोकण्यापासून त्याचा कितीसा फायदा होत असेल, त्याला आपले अभ्यास किती चांगले तयार करितां येत असतील व या घोकंपट्टीचा त्याला किती उपयोग होत असेल, याचा विचार तुम्हीच करा.

---

७ **सद्बोधरत्नहार**–गुरुजी विरुद्ध तक्रार. पृ.८२. ८ **अभ्यास** प्र. ५ पृ.५०

## ९ दयेचा पाझर !

शेख महंमदबाबा, हे मुसलमान जातीचे साधु होते. ह्यांचा पिढिजाद धंदा खाटिकाचा होता. हे १९।१६ वर्षांचे असतां वडिलांच्या आज्ञेवरून बकरें कापण्याकरितां गेले. हें काम करण्याची त्यांची ही पहिलीच खेप होती. त्या बकऱ्याचा दीन शब्द ऐकून, त्यांना फार वाईट वाटलें! जातीनें मुसलमान, खाटकाचा मुलगा, वंशपरंपरेनें निर्दयपणा अंगीं आलेला असावा, असें असतां त्यांच्या मनास दयेचा पाझर फुटला! कापण्याचें दुःख असतें तरी कसें? हें आपणांस समजावें म्हणून त्यांनीं हातांतील सुरीनें स्वतःचें बोट थेडेंसें कापून पाहिलें; त्याबरोबर त्यांना फार वेदना होऊं लागल्या! आपलें बोट जरासें कापलें असतां आपल्याला इतक्या वेदना होतात, तर या बिचाऱ्या मुक्या प्राण्याची मान सुरीनें कापतांना त्याला किती दुःख होईल? हा विचार त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राहिला आणि त्यांना अत्यंत वाईट वाटून, " आजपासून प्राण गेला तरी असें वाईट कृत्य करावयाचें नाहीं, " अशी शपथ वाहून त्यांनीं हातांतील सुरी दूर भिरकावून दिली आणि आयुष्याचा सर्व काल ईश्वरभजनांत घालविला!

## १० अडलेली गोष्ट.

एकादी गोष्ट आपणास समजत नसल्यास ती समजून घेण्याविषयीं पांचदां दहादां फिरून फिरून यत्न करावा, आपल्या बुद्धीची अगदीं शिकस्त करून पाहावी. इतकेंही करून ती नच समजेल, तर मग दुसऱ्याकडून तिची समजूत घ्यावी. अडलेल्या प्रत्येक गोष्टीचा असा विचार करीत गेल्यास आपला फार फायदा होईल.

---

९ **नीतिभूषण**-दयाळु स्वभाव पृ. ९६. १० **अभ्यास**-प्रकरण ६ पृ. ७५

## ११ महात्मा गांधींचें वर्तन.

“ मोहनदास अगदीं साधें जेवण दोन वेळ जेवतात. चहा, कॉफी वगैरे पेयें ते घेत नाहींत. फक्त पाणी व दूध हींच त्यांचीं पेयें आहेत. अन्न शिजविणें, भांडीं घांसणें, कपडे धुणें, केर काढणें, बिछाना घालणें वगैरे कामें ते स्वतः करितात. आपल्या कामासाठीं दुसऱ्या माणसांना त्रास देणें, त्यांच्या मनाला बिलकुल आवडत नाहीं. स्वतःच्या मेहनतीनें कमावलेलें पोटापुरतें अन्न व आच्छादनापुरतें वस्त्र, एवढ्यांत संतुष्ट राहून काया, वाचा व मन लोकसेवेस लावावयाचें, असा त्यांचा निर्धार आहे! त्यांनीं लोकहिताचीं हजारों कामें केलीं, पण त्याबद्दल एक पैही कधीं घेतलेली नाहीं. लोकांनीं त्यांच्या कामगिरीबद्दल कृतज्ञतेनें त्यांस दिलेले नजराणेही त्यांनीं सार्वजनिक कार्यास अर्पण केले आहेत!

---

## १२ सकाळीं लवकर उठणें.

“ कालचें सूर्य उगवल्यानंतर डोळे चोळीत उठून आळसांत वेळ घालविणें कोणीकडे आणि आजचें सकाळींच उत्साहानें उठून सगळा दिवस उद्योगांत व आनंदांत घालविणें कोणीकडे!” काल-चाच ना मी? परंतु कालच्या आणि आजच्या माझ्या वागणुकींत किती हा फरक! आणि तो कशामुळें पडला? केवळ सकाळीं लवकर उठण्यामुळें!

---

**११ सद्बोधमकरंद**-गांधींचें चरित्र-पृ. ६४. **१२ दिवाळीचा देणगी**-रोजनिशींतील वेंचे-पृ. ६९.

## २१ उनाड मुलगा, दिवाण झाला.

दिवाण सर सालरजंग, हे लहानपणीं अतिशय खेळाडू असून कांहीं ना कांहीं निमित्त करून ते शाळा चुकवीत असत! एके दिवशीं ते शाळेंत न जातां, घरांत कोठें लपून बसले, पण त्यांच्या आजीनें त्यांना धुंडून काढून फरफरां ओढीत बाहेर आणिलें आणि ती अतिशय संतापून म्हणाली, "तुला लिहिणें वाचणें आवडत नाहीं, तर तूं जिवंत राहून तरी काय उपयोग? 'खाया काळ आणि भुईला भार!' त्यापेक्षां तूं मेलास तर फार चांगलें होईल!"

म्हातारीचे हे अतिशय संतापाचे शब्द त्यांच्या हृदयास झोंबले! त्यावेळीं त्यांचें वय अवघें दहा वर्षांचें होतें, पण ह्या गोष्टीचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला! त्या दिवसापासून त्यांनीं शाळेच्या कामीं टाळाटाळ करण्याचें अजिबात सोडून देऊन मन लावून अभ्यास केला. विद्याभ्यास पुरा होतांच त्यांनीं निजामशाहींत नोकरी पत्करिली आणि कर्तबगारीनें चढत चढत दिवाणाची जागा पटकावली!

शाळेच्या कामीं टंगळमंगळ करून दडून बसणारा एक मुलगा आजीच्या रागाच्या शब्दांनीं ताळ्यावर येऊन एका मोठ्या संस्थानचा दिवाण होतो, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे? वडील माणसें शेंकडों वेळ रागें भरतात व उपदेशही करितात, पण सगळ्याच मुलांच्या मनावर त्याचा परिणाम होत नाहीं! सालरजंगासारख्या ज्या मुलांच्या मनावर उपदेशाचा परिणाम होतो, तीं उच्च पदास चढावयाचींच!

---

२१ बालतोषिणी–दिवाण सर सालरजंग चरित्र पृ. [illegible]

## २२ अभ्यास आणि प्रकृति.

अभ्यास करणें हें तुझें आजचें मुख्य कर्तव्य आहे खरें, पण तें करण्याच्या नादीं लागून तूं आपल्या शरीरप्रकृतीचें मातेरें करून घेऊं नकोस! तुझी प्रकृति चांगली आहे आणि तूं खेळ वगैरे खेळून व्यायामही करितोस, ही आनंदाची गोष्ट आहे. आपली प्रकृति चांगली राखण्याविषयीं तूं अशीच दक्षता ठेव. पुष्कळ अभ्यासी विद्यार्थी अभ्यासाच्या नादीं लागून आपल्या प्रकृतीचें मातेरें करून घेतात व शेवटीं दुःखांत पडतात. तसें तूं होऊं देऊं नको. अभ्यास तर केला पाहिजेच, पण शरीरप्रकृति चांगली राहण्याकरितां व्यायाम करणें, खेळ खेळणें, नियमितपणानें वागणें हेंही तितकेंच जरूर आहे. हें विसरूं नको.

## २३ परीक्षेच्या वेळीं धैर्य.

परीक्षेच्या वेळीं धैर्य न धरल्यामुळें पुष्कळ चांगलीं मुलेंही नापास होतात. धीर सोडल्यानें अगर निष्कारण काळजी वाहात बसल्यानें आपला यत्किंचितही फायदा न होतां, तोटाच होतो! यासाठीं 'कसें होईल, काय होईल' असें म्हणून गडबडून न जातां, आपण केलेल्या अभ्यासांत आपणास यश मिळणारच, अशी खात्री बाळगावी. 'आपण नापास होणार' असा आपल्या मनाचा ग्रह करून घेऊन व्यर्थ निरुत्साही होऊं नये. त्याचा परिणाम कधींही चांगला होत नाहीं.

---

२२ बालभूषण–सद्बोधामृत- पृ. ३७-३८. २३ अभ्यास–प्रकरण ८ पृ. ९२

## २४ बुंदेले हें नांव कां पडलें ?

काशीच्या सूर्यवंशी राजघराण्यांतला पंचम नांवाचा कोणी एक राजा राज्य करीत असतां, त्याच्या भाऊबंदांनीं त्याचा पराजय करून त्यास राज्यांतून हाकून लाविलें. तेव्हां तो अगदीं हताश होऊन भटकत भटकत विंध्याचलावर आला. या ठिकाणीं 'विंध्यवासिनी' नामक देवीचें स्थान फार प्रसिद्ध असल्यामुळें पंचमानें तेथेंच देवीची आराधना करण्यास सुरवात केली. त्यानें बरेच दिवस एकनिष्ठेनें देवीची उपासना केली, तरी ती प्रसन्न झाली नाहीं; तेव्हां देवीस स्वदेहाचा बळी देण्याचा निश्चय करून त्यानें आपली तलवार उपसली आणि तो आपल्या आंगावर घाव मारून घेऊं लागला. राजाची ती निःसीम भक्ति पाहून देवी विंध्यवासिनी प्रसन्न झाली. तिनें प्रगट होऊन राजाच्या हातांतील तलवार धरली आणि तुझें राज्य तुला परत मिळेल, असा त्यास आशीर्वाद दिला! पंचम राजानें आपल्या आंगावर जे वार केले होते, त्यांतून रक्तबिंदु (बुंद) गळत होते. त्याच्या वंशजांस ह्या भक्तीचें स्मरण रहावें म्हणून 'बुंदेले' हें नांव पडलें. ह्याच्या वंशांत राजा छत्रसाल झाला. बुंदेले राजांचा मुलुख तें बुंदेलखंड. पेशव्यांचे प्रसिद्ध सरदार, गोविंदपंत बुंदेले, यांचें मूळ आडनांव खेर असें होतें. पण पुष्कळ वर्षें त्यांचें वास्तव्य बुंदेलखंडांत झाल्यामुळें, त्यांच्या मूळ आडनांवाचा लोप होऊन बुंदेले हेंच त्यांचें नांव पडलें.

---

२४ नीतिमंजूषा–संक्षेप करून. पृष्ठ ३४–३५.

## २५ भावंडें.

भावंडें म्हटलीं कीं त्यांनीं कसें अगदीं प्रीतीनें असावें. एकमेकांना हरतऱ्हेनें सुख देण्याकरितां झटावें. परस्परांनीं परस्परांना देतां येईल तितकें सुख द्यावें. सगळीं मुलें गोडीगुलाबीनें असलीं म्हणजे घरच्या वडील माणसांनाही त्रास होत नाहीं.

## २६ मुलीस उपदेश.

"पार्वतीबाईची सून अंबू जेव्हां सासरीं आली, तेव्हां तिला एकही काम धडपणें करतां येईना आणि सगळीं लोकं तिला नांवें ठेवूं लागलीं. ती का थोडी शिकलेली होती! मराठी व इंग्रजी बुकं धडाधड वाची, गाणीं काय म्हणे नि कशीदा काय काढी! पण बाईला चूल कशी ती ठाऊक नाहीं. आईबापांची लाडकी! बाईला नुसता सैंपाकसुद्धां करायला शिकवला नव्हता. असो. तूं आईला हातभार लावणं जरूर आहे. "इश्श ग बाई! मी शाळेंत जाऊन पांचवी यत्ता शिकणारी मुलगी, नि असल्या शेणपोतेऱ्यांना हात कसा लावूं? नाहीं ग बाई, मी असल्या कामाला हात लावायची!" असं म्हणून घरच्या कामाचा कंटाळा करूं नको."

## २७ सतत प्रयत्न.

अभ्यास करण्यास सतत प्रयत्नाची फार आवश्यकता आहे, हें पक्कें ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें प्रयत्न करण्यांत बिलकुल कसूर करूं नये. जो सतत प्रयत्न करण्यांत हयगय अगर कंटाळा करील, त्यानें यशाची आशाच करूं नये.

---

२५ बालभूषण-भावंडांशीं वागणूक पृ. ७५. २६ बोधकुसुम--भगिनीची ईणगी पृ. ७१. २७ अभ्यास-प्रकरण ६--पृ. ६०.

## २८ आपल्याच कर्तबगारीवर.

एका अनाथ गरीब बाईचा मुलगा, ज्याला अर्धाआणा फी देण्याचेंही सामर्थ्य नव्हतें, तो बडोद्यासारख्या संस्थानचा दिवाण, पार्लमेंटचा सभासद, व हिंदचा आवडता 'दादा' बनतो! लोकांचीं धोतरें धुणारा, वारांवर निर्वाह करणारा आगरकर, एम्. ए. होऊन कॉलेजचा प्रिन्सिपाल बनतो! म्युनिसिपालिटीच्या दिव्याखालीं अभ्यास करणारा गोखले, देशाच्या कल्याणास आपला देह अर्पून राजाप्रजांकडून धन्यवाद मिळवितो! आई नाहीं, बाप नाहीं, अशा स्थितींत जन्म घालविणारा, ज्याच्या पोटास अन्न मिळविण्याचीही पंचाईत, अशा प्रकारचा आपटे, एम्. ए. होऊन कॉलेजचा प्रिन्सिपाल होतो आणि कोशकार बनून सर्व लोकांच्या आदरास पात्र होतो! कारकुनीच्या जागेसाठीं धडपडणारा पंडित कारकुनांवरच नव्हे तर मामलेदारांवर अंमल गाजविणारा डेप्युटी कलेक्टर होतो! संस्थानचा दिवाण होतो, आणि वेदांसारख्या ग्रंथाचे अर्थ करून 'पंडित' हें नांव यथार्थ करून दाखवितो! ह्या व ह्याप्रमाणेंच घडलेल्या, दुसऱ्या पुरुषांच्या चरित्रांत दिसून आलेल्या सगळ्या गोष्टी, कशाच्या जोरावर झाल्या बरें? नशिबाच्या? छे, छे! नशिबाच्या हातीं ह्या गोष्टी सिद्धीस नेण्याचें सामर्थ्य मुळींच नाहीं! दृढनिश्चयपूर्वक उद्योगानेंच ह्या गोष्टी सिद्धीस गेल्या आहेत.

गरीब विद्यार्थिमित्रांनो, गरिबीमुळें तुम्हीं आपला विद्याभ्यास

२८ चरितादर्श--पृ. ५९--६०.

सोडून देऊं नका. 'कसें करूं, काय करूं' असें रडगाणें गाऊन हातपाय गाळूं नका. दृढनिश्चयानें उद्योगास लागा. भिऊं नका. प्रयत्नास सुरवात करा, म्हणजे तुम्हांला भिवविणाऱ्या साऱ्या अडचणी दूर पळून जातील. यश हें खात्रीनें तुमच्या हातींच आहे असें समजा. ह्या थोर पुरुषांहूनहि श्रेष्ठ प्रतीचा मान तुम्हांला मिळवितां येणार नाहीं काय ? खात्रीनें मिळेल. तुम्ही प्रयत्न मात्र केला पाहिजे.

श्रीमंत पण आळशी विद्यार्थ्यांनो, आजचें बालपण गेलें, विद्यार्थि दशा संपली म्हणजे पुढें पश्चात्ताप करून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, हें ध्यानांत ठेवा आणि झालें तें झालें, यापुढें तरी आपल्या कर्तव्यांत कसूर करूं नका. उठा, लागा उद्योगाला !

**निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंची फळ ।**

८७४

## २९ धन्य सदन.

का. वा.

**अंजनागीत.**

मातापितया मान देउनी । चालति त्यांची आज्ञा मानुनि ।
बालें ऐशीं असती सदनीं । धन्य सदन तेंच ॥ १ ॥
एकमतानें बंधूभगिनी । वसती प्रेमें हसुनि खेळुनी ।
कलह पळाला दूर जेथुनी । धन्य सदन तेंच ॥ २ ॥
विद्यामृत तें प्राशन करितां । वीट न येई ज्यांच्या चित्ता ।
झटती बालें विद्येकरितां । धन्य सदन तेंच ॥ ३ ॥
सन्मार्गानें नित्य चालती । दुर्मार्गी कुणि कधिंहि न वळती ।
नीति निशिदिनीं करिते वसती । धन्य सदन तेंच ॥ ४ ॥

२९ नीतिमाधुर्य--पृ.८९.

IRBK-0100874
IRBK-0100874

# मालेचे आश्रयदाते.

श्री. 'सावित्रीतनय' मुंबई.
प. वा. वा. वि. गोगटे, मिठबांव.
श्री. शिवराम सखाराम शिर्के बी. ए. जळगांव.
प. वा. ग. भि. सरकार, मुंबई.
श्री. श्रीधर नारायण काकतकर, मालवण.
,, दत्तात्रय महादेव पांजरी, मुंबई.
प. वा. गणेश शिवाजी मेथर, कराची.
श्री. शिवबा यदु जानगवळी, मुंबई.
,, 'श्रीधर,' मालवण.
,, डॉ. स. वा. बागवे. एम. बी. ई. एच. एम. पी. एम. बी. एम घाटकूपर.
,, अर्जुन गणपत मिठबांवकर, मुंबई.
,, यशवंत काशिनाथ हिंदळेकर ,,
,, यशवंत भाऊ लोके ,,
,, दुंडाप्पा ईश्वराप्पा गाडवो, पणजी.
,, भिवा बाबाजी चराटकर, मुंबई
,, डॉ. राजाराम वासुदेव आजगांवकर. एल्. एम्. अँन्ड एस्. मालवण.
,, दिनकर दत्तात्रय खांडाळेकर ,,
प. वा. रा. गो. निळेकर, मुंबई.
श्री. ना. कृ. लंगोटे. मालवण.

श्री. धाकू देवजी साठे, मुंबई.
,, भगवंत यशवंत करंगुटकर ,,
,, शंकरगौडा शिदगौडा पाटील, संकेश्वर.
,, गोपाळ राघो भोगांवकर, मालवण.
,, विठोबा येसू सडयेलकर मुंबई.
,, दत्तात्रय गणेश आगाशे बी. ए. एल्. एल्. बी. सबजज, पारनेर.
,, वासुदेव दत्तात्रय सामंत, मालवण.
,, अम्ब्रोज कारिदाद मेंदोसा ,,
,, गिरिधर भिवाजी नेरे. बी. ए. मुंबई.
,, शालोम राहाभीम पेणकर, ,,
,, कैतान अंतोन डिसोजा, मालवण.
,, रामचंद्र विठ्ठल परुळेकर एम. ए. एम. ई. डी. मालवण.
,, नारायण आबाजी पेडणेकर, तळगांव.
,, रघुनाथ विष्णु कांबळी बी. ए. एल्. एल्. बी. वेंगुर्ले.
,, डॉ. विठ्ठल कान्होबा वराडकर, कट्टा.
,, सटवाजी नागाप्पा दहिहंडे वार्डा जं.
श्री. सौ. चंद्रभागाबाई गोपाळराव वराडकर, मुंबई.
,, आनंदीबाई शिवरामराव शिर्के. जळगांव.

एकदम अगर हप्त्यानें वीस रु. देणगी मालेस देणारांस मालेचे आश्रयदाते होतां येतें. आश्रयदात्यांस मालेंत प्रसिद्ध झालेली सर्व पुस्तकें मोफत मिळून प्रत्येक पुस्तकांत त्यांची नांवें प्रसिद्ध केलीं जातात.

श्री. पा. ना. मिसाळ, संपादक बालसन्मित्रमाला यांचीं
मुंबई इलाखा व वऱ्हाड मध्यप्रांत शाळाखात्यानें मंजूर केलेलीं

# मुलांसाठीं उत्कृष्ट पुस्तकें.

| | |
|---|---|
| अभ्यास | ०-६-० |
| सद्बोधमकरंद | ०-६-० |
| नीतिमंजूषा | ०-६-० |
| बालतोषिणी | ०-६-० |
| नीतिमंजरी | ०-६-० |
| कन्याभूषण | ०-६-० |
| नीतिकुसुम | ०-६-० |
| थोरांचें बालपण | ०-५-० |
| चांगलाच धडा मिळाला | ०-२-६ |
| केवळ आपल्याच कर्तबगारीवर | ०-१-६ |
| सत्गुणी मुलांच्या संगतींत | ०-२-० |
| उदार बंधु | ०-१-६ |
| सद्वर्तनाची कसोटी | ०-२-० |
| मातृभक्तीचें फळ | ०-१-० |
| सन्मित्रदर्शन | ०-१-६ |
| गमतीच्या गोष्टी | ०-१-६ |
| बालक | ०-२-० |
| मुलांचें प्रार्थना पुस्तक | ०-१-६ |
| आज्ञाभंगाचें प्रायश्चित्त | ०-२-६ |
| शेवटीं सत्याचा विजय | ०-२-० |
| दत्तूचा थोरपणा | ०-१-६ |
| याचें नांव मित्रप्रेम | ०-१-६ |
| मातृदेवता (कादंबरी) | ०-१०-० |
| विवेक गुटिका. | ०-४-० |
| एकलव्य | ०-३-० |

एजंट्स्—१. परचुरे पुराणिक मंडळी, माधवबाग-मुंबई.
२. ल. ना. गोडबोले, बुकसेलर, पुणें.
३. आनंदकार्यालय, ३३० सदाशिव पेठ, पुणें.

**मुंबई**—तु. पुं. शेट्ये माधवबाग; दत्त बुकडेपो, ठाकूरद्वार व इतर प्रसिद्ध बुकसेलर्स. **पुणें**—सर्व प्रसिद्ध बुकसेलर्स. **कराची**—द. वा अणावकर **जळगांव** (पू. खा.) दत्तात्रय कंपनी. **नाशिक**—जी. के ब्रदर्स. **सांगली कोल्हापूर**—एस्. ए. कुळकर्णी, पी व्ही. गोळवलकर, **बेळगांव**—श्रीराम-तत्वप्रकाश बुकडेपो. **रत्नागिरी**—डी. जी. मुकादम. **सावंतवाडी**-कुंज-विहारी कार्यालय. **म्हापसें**—रगजी बुकसेलर. **डिचोली**—बा. ना. पालेकर. **मडगांव**—वा. अ. बाळे गोमांतक बुकडेपो.

व्यवस्थापक—बालसन्मित्र-कार्यालय, मालवण, जि. रत्नागिरी.

मुद्रक—गोपाळ बळवंत जोशी, आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें.